# त्रिवार वंदन तुला !

## (देशभक्तीपर गीते)



# वंदे मातरम्

वंदे मातरम् !

सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम्
सश्यश्यामलाम् मातरम् । वंदे मातरम् ।।

शुभ्रज्योत्स्ना पुलकित यामिनिम्
फुल्लकुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुरभाषिणिम्
सुखदाम् वरदाम् मातरम् ।। वंदे मातरम् !

कोटि कोटि कण्ठ कलकल निनाद कराले,
कोटि कोटि भुजैर्धृत खरकरवाले,
अबला केन मा एकबले बहुबलधारिणिम्
नमामि तारिणिम् रिपुदलवारिणिम् । मातरम् !
वंदे मातरम् !!

तुमि विद्या, तुमि धर्म, तुमि ह्रदि, तुमि मर्म
त्वं हि प्राणाः शरीरे, बाहुते तुमि मा शक्ति,
ह्रदये तुमि मा भक्ति, तोमारई प्रतिमा गडि मंदिरे ।
मातरम् ! वंदे मातरम् !!

त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी ।
कमला कमलदल विहारिणी । वाणी विद्यादायिनी,
नमामि त्वां । नमामि कमलाम्, अमलाम्, अतुलाम्
सुजलाम्, सुफलाम् मातरम् ।। वंदे मातरम् !!

श्यामलाम्, सरलाम्, सुस्मिताम्, भूषिताम्
धरणीम् भरणीम् मातरम् । वंदे मातरम् !!

- बंकिमचंद्र




# त्रिवार वंदन तुला !

(देशभक्तीपर गीते)

साटम उद्योग™
www.satamudyogbooks.com

- ई-बुक आवृत्ती

- संकलन व संपादन : गुरुदास

- प्रकाशक : हेमंत स. साटम

- मुद्रक : साटम उद्योग
  २०३, अमित इंड. इस्टेट,
  लालबाग, मुंबई-४०० ०१२.
  ८१६९९ ८४९२७

# अनुक्रम :


| | | |
|---|---|---|
| | प्रास्ताविक | ४ |
| १. | हा हिन्द देश माझा | ६ |
| २. | सागरास | ७ |
| ३. | वंदे मातरम् | ९ |
| ४. | स्वतंत्रतेचे स्तोत्र | १० |
| ५. | क्रांतीचा जयजयकार | ११ |
| ६. | बलसागर भारत होवो | १३ |
| ७. | हिंदपुत्रांनो | १४ |
| ८. | चले जाव, चले जाव | १६ |
| ९. | राष्ट्रध्वजास वंदन ! | १७ |
| १०. | ध्वज विजयाचा उंच धरा रे | १८ |
| ११. | स्वातंत्र्य भारताला | १९ |
| १२. | शिंग फुंकिले रणी | २० |
| १३. | चलो दिल्ली | २१ |
| १४. | घेइ प्रणाम | २२ |
| १५. | जय भारता ! | २४ |
| १६. | प्रणामा घे या | २५ |
| १७. | आचंद्र सूर्य नांदो ... | २६ |
| १८. | प्रियतम अमुची भारतामाता | २७ |
| १९. | परवशता पाश, ऐसे जिणे कशाला ! | २८ |
| २०. | देशभक्तीपर काव्यपंक्ती | २९ |
| २१. | दे वरचि असा दे ! | ३० |
| २२. | झेंडा उंच धरू | ३१ |
| २३. | विजयी भारत | ३२ |
| २४. | प्रतापशाली गौरवशाली | ३३ |
| २५. | अमुचे प्रियकर हिंदुस्थान | ३४ |
| २६. | डुमडुमत डमरु ये | ३५ |
| २७. | रे हिंदबांधवा, थांब या स्थळीं | ३६ |
| २८. | मंत्र वंदे मातरम् | ३७ |
| २९. | तेथे कर माझे जुळती | ३८ |
| ३०. | मातृभूमीची प्रार्थना | ३९ |
| ३१. | सारे जहाँ से अच्छा | ४० |

**“जननि जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरियसी ।”**

**सं**स्कृत भाषेतील हे एक अतिशय सुपरिचित आणि अर्थपूर्ण सुभाषित आहे. माता आणि मातृभूमी यांची गरिमा स्वर्गप्राप्तीच्या सुखापेक्षा अधिक श्रीमंत आहे, असा या सुभाषिताचा थोडक्यात आशय. आणि हा आशय म्हणजे एक त्रिकाल सत्य होय.

जो आईच्या प्रेमाला मुकला, मातृसुखाला वंचित झाला, जो मातृभूमीला पारखा झाला तो खऱ्या अर्थाने अभागी, दीन आणि दरिद्री ठरतो. ही अतिशयोक्ती नव्हे तर सर्वकालिन अनुभूती आहे.

मातृभूमीबद्दल देशभक्तांच्या मनातील आस सुद्धा अतिशय दृढ आणि अपार असते, उत्कट असते. या उत्कटतेमुळेच मातृभूमीच्या अस्तित्वासाठी, तिच्या सुखरुपतेसाठी अगदी सामान्य देशभक्त रणांगणातील सैनिकासारखा प्राणार्पण करण्यास सिद्ध होतो. अनेक हालअपेष्टा सोसायला तयार होतो.

आपली मातृभूमी-भारतमाता ब्रिटिश साम्राज्याच्या अमलाखाली परतंत्र असताना तिला बंधमुक्त करण्यासाठी असंख्य देशभक्तांनी आपले तन-मन-धन यावर तुळशीपत्र ठेऊन फार मोठा त्याग केला. या त्यागातून स्वतंत्र झालेल्या

मातृभूमीला सुरक्षित ठेवण्यासाठी, देशावर आलेल्या परचक्राच्या वेळी भारतीय सेनेतील अगणित जवानांनी धारातीर्थी आपल्या रक्ताचे सडे शिंपले. शत्रूशी लढता लढता प्राणांची कुरवंडी ओवाळून टाकली.

मातृभूमीसाठी साऱ्या देशवासियांनीच त्याग केला. महाराष्ट्राने तर देशासाठी त्याग व बलिदान करणाऱ्या देशभक्तांची एक त्यागी पिढीच जन्माला घातली. मातृभूमीबद्दल हृदयात असणारा हा पूज्यभाव, तिच्याबद्दल वाटणारं प्रेम हा भावच खूप असाधारण असतो. त्यापुढे सारं काही त्याज्य ठरतं, तुच्छ वाटतं. अशा या उत्कट देशभक्तीचा महिमा वर्णन करणाऱ्या अनेक कविता सर्व भाषातील प्रतिभावंत कवींनी लिहून ठेवल्या आहेत. या कवितांनी सर्वसामान्य माणसातील मातृभूमीबद्दलचा भक्तीभाव सदैव जागृत आणि उंचावत ठेवला आहे. अशाच काही मराठी भाषेतील लोकप्रिय व भावपूर्ण असलेल्या देशभक्तीपर गीतांचे संकलन या छोटेखानी पुस्तकात समाविष्ट केले आहे.

या संग्रहातील कविता लहानांपासून थोरामोठ्यांपर्यंत सर्वांना प्रेरणादायी ठरतील व त्यांच्या मनातील राष्ट्रभक्तीचा भाव उंचावत ठेवतील अशी आशा.

**- गुरुदास**